क्रमांक. 200122FTS0049
जिल्हाधिकारी कार्यालय,रत्नागिरी
दिनांक : 22/01/2020

# आदेश

विषय : जैव वैद्यकीय घनकरा विशेष कृतीदल (Special Task Force) स्थापन करणेबाबत.

संदर्भ : १. मा. हरितलवाद, नवी दिल्ली यांचे ओ एक नं.६०६/२०१८ अन्वये दि.०८/०४/२०१९ चे आदेश.
२. मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन यांची दि.१३/०६/२०१९ रोजीच्या बैठकीचे इतिवृत्त. (व्हीडीओ कॉन्फरन्सद्वारे)
३. मा. सदस्य सचिव, म.प्र.नि. मंडळ, मुंबई यांचे पत्र क्र. MPCB/PSO/B-995 दि. १३.०३.२०१९.

**आदेश :-**

उपरोक्त विषयास अनुसरुन मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन यांनी हरित लवाद, नवी दिल्ली यांच्या ओ एक ६०६/२०१८ नुसार दि.०८/०४/२०१९ रोजीच्या निर्देशास अनुसरुन दि.१३/०६/२०१९ रोजी व्हीडीओ कॉन्फरन्सद्वारे बैठक आयोजित केली होती. सदर बैठकी दरम्यान जिल्हास्तरीय विशेष कृतीदल स्थापन करणेबाबत निर्देश देण्यात आले होते.

त्यास अनुसरुन जैव वैद्यकीय कचरा अधिनियम, २०१६ अंतर्गत जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली रत्नागिरी जिल्हास्तरीय सल्लागार समितीचे याद्वारे गठन करणेत येत असून, समितीची रचना खालीलप्रमाणे करण्यात येत आहे.

| | | |
|---|---|---|
| १ | मा. जिल्हाधिकारी, रत्नागिरी | अध्यक्ष |
| २ | जिल्हा शल्यचिकित्सक, रत्नागिरी | सदस्य |
| ३ | जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, रत्नागिरी | सदस्य |
| ४ | मुख्याधिकारी,<br>नगर परिषद- रत्नागिरी, राजापूर, चिपळूण, खेड<br>नगर पंचायत – देवरुख, लांजा, गुहागर, दापोली, मंडणगड | सदस्य |
| ५ | आरोग्य अधिकारी<br>नगर परिषद- रत्नागिरी, राजापूर, चिपळूण, खेड<br>नगर पंचायत – देवरुख, लांजा, गुहागर, दापोली, मंडणगड | सदस्य |
| ६ | उप प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, रत्नागिरी | सदस्य |
| ७ | उप प्रादेशिक अधिकारी, म. प्र. नि. मंडळ, चिपळूण | सदस्य |
| ८ | प्रतिनिधी, इंडियन मेडीकल असोसिएशन, | सदस्य |
| ९ | प्रतिनिधी, मे. महाराष्ट्र बायो हायजेनिक मॅनेजमेंट | सदस्य |

**समितीची कार्यकक्षा:-**

1) जैव-वैद्यकीय कचरा अधिनियम, २०१६ अंतर्गत नियमांची जिल्हास्तरावर योग्यरित्या अंमलबजावणी केली जाते अथवा नाही यावर देखरेख ठेवणे.
2) समितीची त्रैमासिक बैठक घेणे.
3) मुंबई नर्सिंग होम रजिस्ट्रेशन ॲक्ट-१९४९ च्या अंमलबजावणीचा आढावा घेणे.
4) खाजगी व शासकीय रुग्णालयाचा जैविक वैद्यकीय कचरा (BMW) नोंदणीबाबत आढावा घेणे.

5) रुगालयांत किती जैविक वैद्यक कचरा निर्माण होतो व त्याची विल्हेवाट कशी लावली जाते याबाबत आढावा घेणे.

6) जैविक वैद्यक कचरा विल्हेवाट लावण्यासाठी Common Treatment & Disposal Facility याचा आढावा घेणे.

7) जैविक वैद्यक कचराबाबत शासकीय व खाजगी रुग्णालयांच्या अडीअडचणी जाणून घेणे.

8) जैविक वैद्यक कच-याच्या साठवणूक व विल्हेवाट यासाठी परिणामकारक उपाययोजनांबाबत उपाय सुचविणे व अंमलबजावणी करणे.

9) क्षेत्रिय भेटी देऊन पाहणी करणे.

(सुनील चव्हाण)
जिल्हाधिकारी रत्नागिरी

प्रतिलिपी-माहितीस्तव सादर :-

१. मा. जिल्हाधिकारी, रत्नागिरी
२. जिल्हा शल्यचिकित्सक, रत्नागिरी
३. जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, रत्नागिरी
४. मुख्याधिकारी,
नगर परिषद- रत्नागिरी, राजापूर, चिपळूण, खेड
नगर पंचायत – देवरुख, लांजा, गुहागर, दापोली, मंडणगड
५. आरोग्य अधिकारी
नगर परिषद- रत्नागिरी, राजापूर, चिपळूण, खेड
नगर पंचायत – देवरुख, लांजा, गुहागर, दापोली, मंडणगड
६. उप प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, रत्नागिरी
७. उप प्रादेशिक अधिकारी, म. प्र. नि. मंडळ, चिपळूण
८. प्रतिनिधी, इंडियन मेडीकल असोसिएशन, रत्नागिरी
९. प्रतिनिधी, महाराष्ट्र बायो हायजेनिक मॅनेजमेंट, लोटे, ता.खेड, जि. रत्नागिरी